यांत्रिकी संघटनेअंतर्गत अंदाजपत्रके तयार करणेसाठी मार्गदर्शक सूचना

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
शासन परिपत्रक क्र.: संकीर्ण-२०१९/प्र.क्र.५१/२०१९/यांत्रिकी,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक : २० जुलै, २०१९.

संदर्भ : शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१९/(प्र.क्र. ५१/१९)/ यांत्रिकी, दिनांक १६.०४.२०१९.

प्रस्तावना :-

यांत्रिकी संघटनेमार्फत जल द्वारे व उच्चालक- निर्मिती, उभारणी व दुरुस्ती, मातीकाम / कालवा स्वच्छता कामासाठी संयंत्रे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्ती, उपसा सिंचन योजना कार्यान्वित करणे, पंप व इतर घटक भाग दुरुस्ती, विंधन कामे इत्यादी कामे केली जातात. सदर कामांबाबतच्या अंदाजपत्रकात विशेषत: एकाच कार्यप्रकारातील अंदाजपत्रकात समानता व सुसूत्रीपणा दिसून येत नाही, असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने यांत्रिकी संघटनेतंर्गत विविध कामांसाठी अंदाजपत्रक तयार करतांना कोणते एकक (Unit) असावे, याबाबत मार्गदर्शक सूचना तयार करणेसाठी गठीत केलेल्या समितीने कामाचे तपशील निहाय एकक (Unit) अंतिम केले आहे. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

परिपत्रक :

उपरोक्त यांत्रिकी कामांबाबतच्या अंदाजपत्रकात समानता व सुसूत्रीपणा आणण्यासाठी खाली दर्शविलेल्या परिमाणापेक्षा लहान कामांचे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येवू नये.

	कामाचा तपशील	एकक
अ)	**द्वारे निर्मिती कामे - प्रकल्प निहाय**	
१)	वक्रद्वारे - निविष्ठ भागांसह सर्व घटकभागांची (ए.जी. ब्रीज, हाईस्ट/ उच्चालक ब्रीज इ. सह) एका धरणावरील द्वाराची निर्मिती कामे.	पूर्ण घटक
२)	वक्रद्वारे- उच्चालक निर्मिती कामे	पूर्ण घटक
३)	थोपद्वारे -निविष्ठ भाग, द्वारकळी, इ. सर्व घटकभागांची निर्मिती कामे.	पूर्ण घटक
४)	गोलिएथ क्रेन व लिफ्टींग अरेंजमेंट घटकभागांची निर्मिती कामे.	पूर्ण घटक
५)	उभी उचलद्वारे - निविष्ठ भागांसह सर्व घटकभागांची एका धरणावरील सर्व द्वारांची निर्मिती कामे.	पूर्ण घटक
६)	उभी उचलद्वारे उच्चालक (सपोर्टिंग स्ट्रक्चर सह) निर्मिती कामे.	पूर्ण घटक
७)	ट्रॅशरॅक, बल्कहेड, बेल माऊथ, ट्रान्झीशन झोन इ. निर्मिती कामे.	पूर्ण घटक
८)	पेनस्टॉक पाईप, वायपीस यांची निर्मिती कामे.	पूर्ण घटक
९)	धरणावरील झडपद्वारे - सेवाद्वार, आपत्कालीन द्वार इ. निविष्ठ भाग व उच्चालकासह एका धरणावरील सर्व द्वारांची निर्मिती कामे.	पूर्ण घटक
१०)	कालव्यावरील साखळी क्रमांक नुसार काटनियामक द्वारे, एस्केप गेट- एका ठिकाणच्या सर्व द्वारांची सर्व घटकभागांची व उच्चालकासह निर्मिती व उभारणी कामे	पूर्ण घटक
११)	लहान कालवा द्वारे - उदा. आकार ०.३ x ०.३ मी., ०.४५ x ०.४५ मी., ०.६ x ०.६ मी., ०.९ x ०.९ मी. इ. - सर्व घटकभागांसह उच्चालकासह निर्मिती व उभारणी कामे (प्रतिद्वार)	५ कि.मी. मधील सर्व द्वारे एकत्रित
१२)	को. प. बंधाऱ्यावरील वक्राकार व सरळ बर्गे (Curved & Straight Needle Gates) निर्मिती कामे	एका प्रकल्पावरील सर्व द्वारे एकत्रित

कामाचा तपशील		एकक
१३)	ऑटोमॅटिक गेट, गोडबोले गेट इ. - सर्व घटकभागांसह निर्मिती व उभारणी कामे.	पूर्ण घटक
१४)	केबीन, शिड्या, वॉटर ल्युब्रीकेशन इ. एका धरणावरील सर्व संकीर्ण निर्मिती व उभारणी कामे	पूर्ण घटक
१५)	धरणावरील जनरेटर पुरवठा व उभारणी कामे.	पूर्ण घटक
१६)	धरणावरील इलेक्ट्रीफिकेशन, लाईटिंग इ. सर्व विद्युत कामे.	पूर्ण घटक
ब)	**द्वारे उभारणी कामे - प्रकल्प निहाय**	
१)	वक्रद्वारे - निविष्ठ भागांची उभारणी कामे.	पूर्ण घटक
२)	थोपद्वारे- निविष्ठ भागांची उभारणी कामे.	पूर्ण घटक
३)	वक्रद्वारे - द्वारकळी व उच्चालक इतर सर्व घटकभागांची उभारणी कामे.	पूर्ण घटक
४)	थोपद्वारे - द्वारकळी, लिफ्टींग अरेंजमेंट इ. सर्व घटकभागांची उभारणी कामे.	पूर्ण घटक
५)	गोलिएथ क्रेन घटकभागांची उभारणी कामे.	पूर्ण घटक
६)	उभी उचलद्वारे - निविष्ठ भागांची उभारणी कामे.	पूर्ण घटक
७)	उभी उचलद्वारे - द्वारकळी, उच्चालक (सपोर्टिंग स्ट्रक्चर सह) उभारणी कामे.	पूर्ण घटक
८)	धरणावरील सर्व झडपद्वारे - सेवाद्वार, आपत्कालीन द्वार इ. चे निविष्ठ भाग उभारणी कामे.	पूर्ण घटक
९)	धरणावरील सर्व झडपद्वारे - सेवाद्वार, आपत्कालीन द्वार इ. चे द्वारकळी, उच्चालका इ. सह सर्व घटकभागांची उभारणी कामे.	पूर्ण घटक
क)	**द्वारे दुरूस्ती कामे - प्रकल्प निहाय**	
१)	पर्जन्यपूर्व द्वारे निरिक्षण अहवालातील मुद्दयांनुसार करावयाची एका धरणावरील सर्व संकीर्ण / किरकोळ देखभाल व दुरूस्ती कामे.	पूर्ण घटक
२)	पर्जन्योत्तर द्वारे निरिक्षण अहवालातील मुद्दयांनुसार करावयाची एका धरणावरील सर्व संकीर्ण / किरकोळ देखभाल व दुरूस्ती कामे.	पूर्ण घटक
३)	वक्रद्वारे - द्वारे, उच्चालक, थोपद्वारे इ. सर्व घटक भागांची दुरूस्ती कामे.	वक्रद्वाराची संबंधित सर्व दुरूस्ती कामे एकत्रित
४)	उभी उचल द्वारे - द्वारे, उच्चालक, थोपद्वारे इ. सर्व घटक भागांची दुरूस्ती कामे.	द्वारांच्या संबंधित दुरूस्ती कामे एकत्रित
५)	धरणावरील क्रमांकावरील सेवाद्वारे, आपत्कालीन द्वारे, शिघ्रगती सेवाद्वारे, पातेरी जाळ्या, नदी विमोचक इ. द्वारांची दुरूस्ती कामे.	पूर्ण घटक
६)	कालव्यावरील काटनियामक द्वारे, एस्केप गेट - एका ठिकाणच्या सर्व द्वारांची दुरूस्ती उच्चालकासह कामे	पूर्ण घटक

	कामाचा तपशील	एकक
७)	लहान कालवा द्वारे - उदा. आकार ०.३ x ०.३ मी., ०.४५ x ०.४५ मी., ०.६ x ०.६ मी., ०.९ x ०.९ मी. इ. - दुरूस्ती कामे.	५ कि.मी. मधील सर्व द्वारे एकत्रित
८)	को. प. बंधाऱ्यावरील वक्राकर व सरळ बर्गे ((Curved & Straight Needle Gates) प्रतिद्वार दुरुस्ती कामे	एका प्रकल्पावरील सर्व द्वारे एकत्रित
९)	ऑटोमॅटिक गेट, गोडबोले गेट इ. द्वारांची दुरूस्ती कामे.	पूर्ण घटक
१०)	जनरेटर, इलेक्ट्रीफिकेशन, लाईटिंग इ. विद्युत स्वरूपाची दुरूस्ती कामे	पूर्ण घटक
ड) संयंत्रे परिचलन व दुरूस्ती विषयक कामे.		
१)	संयंत्राच्या एकावेळी नादुरूस्त झालेल्या विविध सिस्टिमच्या दुरूस्तीचे एकत्रित प्रति संयंत्र अंदाजपत्रक	पूर्ण घटक
२)	संयंत्रे परिचलन देखभालीकरिता एका उपविभाग निहाय एका वर्षाकरिता जड यंत्रचालक, वाहन चालक, चौकीदार, मदतनीस इ. सर्वांसाठी एकच अंदाजपत्रक	पूर्ण घटक
इ) उपसा सिंचन योजना कामे. (**मूळ कामे**)		
१)	पंप गृहातील पंपाचे सर्व Electromechnical निर्मिती, पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यान्वीतीकरण कामे इ. (टप्पा निहाय)	पूर्ण घटक
२)	अँटी सर्ज साठी आवश्यक एअर व्हेसल/ब्लॅडर व्हेसल, झिरो व्हेलॉसिटी व्हॉल्व इ. सर्व घटकभागांची निर्मिती, पुरवठा, उभारणी, चाचणी इ. कामे. (Rising Main निहाय)	पूर्ण घटक
३)	पंपगृहातील इ.ओ.टी. निर्मिती, उभारणी व कार्यान्वीतीकरण कामे. (टप्पा निहाय)	पूर्ण घटक
४)	जनरेटर सेट, पुरवठा व उभारणी कामे (टप्पा निहाय)	पूर्ण घटक
ई) उपसा सिंचन योजना कामे, परिचलन देखभाल व दुरुस्ती कामे		
१)	पंप गृहातील पंपाची यांत्रिकी दुरूस्ती कामे (पंप निहाय)	पूर्ण घटक
२)	पंप गृहातील पंपाची विद्युत दुरूस्ती कामे (पंप निहाय)	पूर्ण घटक
३)	पंप गृहातील व्हॉल्व ,व्हॉल्व Actuator व रबर एक्सपान्शन जाईंट दुरूस्ती कामे (Delivery Pipe निहाय)	पूर्ण घटक
४)	पंप गृहातील लाईटिंग इ. विद्युत स्वरूपाची दुरूस्ती कामे (टप्पा निहाय)	पूर्ण घटक
५)	HT Panel & Allied accessories यांची दुरुस्ती कामे. (टप्पा निहाय)	पूर्ण घटक
६)	LT Panel & Allied accessories यांची दुरुस्ती कामे (टप्पा निहाय)	पूर्ण घटक
७)	पंप गृहातील EOT चे Electromechnical दुरुस्ती कामे (टप्पा निहाय)	पूर्ण घटक
८)	Capacitor, auxilary trasformer, DCDB, soft starter,बॅटरी व बॅटरी चार्जर व allied electrical equipment यांची दुरुस्ती कामे. (टप्पा निहाय)	पूर्ण घटक
९)	वार्षिक पंपाचे परिचलन, देखभाल कामे करणे (टप्पा निहाय)	पूर्ण घटक

	कामाचा तपशील	एकक
१०)	अँटी सर्ज साठी आवश्यक एअर व्हेसल / ब्लॅडर व्हेसल, झिरो व्हेलॉसिटी व्हॉल्व इ. सर्व घटकभागांची देखभाल, दुरूस्ती कामे. (Rising Main निहाय)	पूर्ण घटक
११)	पाईपलाईन दुरूस्ती कामे	पूर्ण घटक

वर दर्शविल्याप्रमाणे कामाच्या एककांसमवेत यांत्रिकी संघटनेअंतर्गत बाहय अभिकरणामार्फत करावयाच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करणेसाठी खालील अटींचे पालन होणे आवश्यक आहे.

१) एकाच प्रकल्पाच्या द्वारे / उपसा सिंचन योजना कार्यप्रकारच्या कामासाठी संबंधित महामंडळाच्या एका प्रापण सूचीत अंतर्भूत बाहयअभिकरणामार्फत समाविष्ट करावयाची कामे (यांत्रिकी संघटनेंतर्गत (Inhouse) करावयाच्या कामाव्यतिरिक्त) एकाच अंदाजपत्रकात समाविष्ट करावी.

२) एकाच प्रकल्पावरील सर्व प्रकारचे द्वार दुरुस्ती / उच्चालक दुरुस्ती / इतर दुरुस्ती / विद्युत दुरुस्ती इ. सर्व बाबींचा स्थापत्य च्या मागणीनुसार किंवा द्वार निरीक्षण अहवालामध्ये नमूद केलेनुसार कामाची विभागणी न करता एकत्रित स्वरुपाचे एकच अंदाजपत्रक तयार करून त्यास मंजुरी दयावी.

३) थोपद्वारे हाताळणी (Stop Log Gates Handling) साठी अंदाजपत्रक तयार करतांना कोणत्याही परिस्थितीत Tonnage Basis वरील हाताळणी दराच्या आधारे तयार न करता प्रत्यक्ष थोपद्वारे हाताळणीसाठी लागणारे आवश्यक मनुष्यबळ व त्यांचा दर यानुसारच तयार करण्यात यावेत.

४) शासकीय कामकाजात पारदर्शकता असावी, कामाची गुणवत्ता सुधारावी व विभागाची प्रतिमा उजळावी यासाठी कार्यालयीन कामकाज करतांना खालील चुका / अनियमितता होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

- अंदाजपत्रकासाठी युनिट काय असावे, याकडे पुर्णत: दुर्लक्ष करून स्वत:च्या अधिकारामध्ये अंदाजपत्रके निविदाची विभागणी करणे व मंजूरी देणे, कामाचे लहान भाग करून निविदेस व्यापक प्रसिध्दी न देणे आणि स्पर्धा न झाल्यामुळे वाजवी दर न देणे, निविदांना जाहीर प्रसिध्दी न देता किंवा प्रक्रिया पूर्ण केल्याचा आभास करुन ठराविक ठेकेदारांना कामे देणे, नियमाप्रमाणे खरेदी न करता Providing and fixing या बाबीखाली खरेदी करणे.
- देखभाल दुरुस्तीच्या कामाची आवश्यकता निश्चित करण्यासाठी कामाचे निरीक्षण कोणत्याही स्तरावर न करणे, निरीक्षण टिप्पणी न काढणे इ. देखभाल दुरुस्तीच्या कामाचे अंदाजपत्रक अवास्तवपणे व प्रत्यक्ष मोजमापे न घेता तयार करणे, दरवर्षी देखभाल दुरुस्तीच्या कामावर मोठया प्रमाणावर खर्च करणे.
- निधी उपलब्ध नसतांना ते पण अनावश्यक व अनुत्पादक कामे हातात घेवून मोठे दायित्व निर्माण करणे आणि वर्षानुवर्षे दायित्व निर्माण करणेची प्रथा राबविणे, उपलब्ध निधीपेक्षा जास्त खर्च व जास्त दायित्व निर्माण करणे.
- स्वत:च्या अधिकारात नसलेल्या निविदांना मंजूरी देणे व काम करणे.
- निविदेतील एखादया बाबीचे परिमाणात आधिक्य होत असताना वरिष्ठांना न कळविता, परवानगी न घेता त्या बाबींवरील आधिक्य प्रमाणाबाहेर वाढविणे.

- दरसूचीच्या बाहेरील बाबीचे वस्तुनिष्ठपणे पृथक्करण न करता व सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता न घेता अशा बाबीनुसार अंदाजपत्रक करणे.
- वेळेवर जुन्या वाहनांचे निर्लेखन न करणे, वेळेवर अतिरिक्त सामग्री / वस्तू इतर खात्यास/ विभागाला कळवून त्याचा वापर / निपटारा न करणे, नियमांचे पालन न करता वस्तूचा लिलाव करणे.

वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, अन्यथा संबंधित जबाबदार अधिकारी शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरतील.

सदर शासन परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१९०७२०१११८४०५९२७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ranjit Shivajirao Ahire

Digitally signed by Ranjit Shivajirao Ahire
DN: CN = Ranjit Shivajirao Ahire, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Resources Department
Date: 2019.07.22 11:08:23 +05'30'

(र. शि अहिरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) मा मंत्री (जलसंपदा विभाग) यांचे खाजगी सचिव.
२) मा राज्यमंत्री (जलसंपदा विभाग) यांचे खाजगी सचिव.
३) प्रधान सचिव (जलसंपदा विभाग) यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई-३२.
४) सचिव (लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई-३२
५) सचिव (प्रकल्प व समन्वय) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई-३२
६) सर्व मुख्य अभियंता व सह सचिव /सर्व उप सचिव जलसंपदा विभाग, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७) सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग,
८) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
९) अधीक्षक अभियंता,यांत्रिकी मंडळ, नाशिक/नागपूर/पुणे/नांदेड/कोल्हापूर
१०) सर्व कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) जलसपंदा विभाग.
११) यांत्रिकी कार्यासन (संग्रहार्थ).